# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम/ विद्युत विभाग

## दि. १५ / ०९ /२०२५

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक.(२२१)** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध मालमत्ता अंतर्गत स्मशानभुमी, दफनभुमी, मनपा मुख्य कार्यालय इमारत, मनपा प्रभाग कार्यालये, शाळा इमारती, बालवाडी, अंगणवाडी, अग्निशमन केंद्र, स्काय वॉक, पुतळे, सभागृह, समाजमंदिरे, विरंगुळा केंद्र, स्टेज, वाचनालय, अभ्यासिका व इतर सार्वजनिक इमारती, बेंस डेपो, बस स्टॅण्ड, आयुक्त निवास / महापौर निवास, विविध नामफलक, दिशादर्शक फलक, आरोग्य केंद्र, रुग्णालय इ., तळी, विहीर, दुभाजक, वाहतुक बेट, सार्वजनिक इमारती गळती प्रतिबंधक इ.कामे द्वि वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती कामे करणे. (ई-2259984)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता आहेत. त्यांची नियमितपणे देखभाल, दुरूस्ती करणे आवश्यक आहे. स्वच्छ भारत अभियानातंर्गत मालमत्ता सुस्थितीत राखण्यासाठी मालमत्तांमध्ये विविध कामे करावी लागत आहेत. राज्य शासन/ केंद्र शासनाच्या विविध योजनेतंर्गत नियमितपणे मालमत्तांची दुरूस्ती करून मनपा मालमता व्यवस्थितरीत्या ठेवणे आवश्यक आहे. मनपा विविध मालमत्तांची दुरूस्ती कामी सन 2022-23 च्या राज्य दर सुचीनुसार रु.10,00,00,000/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामी सन 2025-26 या आर्थिक वर्षातील "मनपा सार्व. इमारती/ मालमत्ता देखभाल दुरूस्ती/ पाण्याच्या टाक्या व इतर कामे" या लेखशिर्षाखाली रु.90.00 लक्ष इतकी रक्कम शिल्लक असून मार्च 2026 पर्यंत सदर खर्च करण्यात येणार आहे. उर्वरीत खर्च सन 2026-27 या आर्थिक वर्षामध्ये "मनपा सार्व. इमारत/ मालमत्ता देखभाल दुरूस्ती/ पाण्याच्या टाक्या व इतर कामे" या लेखशिर्षामध्ये तरतुद करून खर्च करण्यात येणार आहे. सदरचे काम हे पॅनलव्दारे करण्यात येणार आहे.

सदर कामी रु.10,00,00,000/- इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच ई-निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेस शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-5/2025-26/DK/MG-10

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक २५/०९/ २०२५

**प्रकरण क्रमांक :-(२२९)** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध मालमत्ता अंतर्गत स्मशानभुमी, दफनभुमी, मनपा मुख्य कार्यालय इमारत, मनपा प्रभाग कार्यालये, शाळा इमारती, बालवाडी, अंगणवाडी, अग्निशमन केंद्र, स्काय वॉक, पुतळे, सभागृह, समाजमंदिरे, विरंगुळा केंद्र, स्टेज, वाचनालय, अभ्यासिका व इतर सार्वजनिक इमारती, बस डेपो, बस स्टॅण्ड, आयुक्त निवास / महापौर निवास, विविध नामफलक, दिशादर्शक फलक, आरोग्य केंद्र, रुग्णालय इ., तळी, विहीर, दुभाजक, वाहतुक बेट, सार्वजनिक इमारती गळती प्रतिबंधक इ.कामे द्वि वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती कामे करणे. (ई-2259984)

**ठराव क्रमांक :- (२२९)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता आहेत. त्यांची नियमितपणे देखभाल, दुरूस्ती करणे आवश्यक आहे. स्वच्छ भारत अभियानातंर्गत मालमत्ता सुस्थितीत राखण्यासाठी मालमत्तांमध्ये विविध कामे करावी लागत आहेत. राज्य शासन/ केंद्र शासनाच्या विविध योजनेतंर्गत नियमितपणे मालमत्तांची दुरूस्ती करून मनपा मालमत्ता व्यवस्थितरीत्या ठेवणे आवश्यक आहे. मनपा विविध मालमत्तांची दुरूस्ती कामी सन 2022-23 च्या राज्य दर सुचीनुसार रु.10,00,00,000/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामी सन 2025-26 या आर्थिक वर्षातील "मनपा सार्व. इमारती/ मालमत्ता देखभाल दुरूस्ती/ पाण्याच्या टाक्या व इतर कामे" या लेखशिर्षाखाली रु.90.00 लक्ष इतकी रक्कम शिल्लक असून मार्च 2026 पर्यंत सदर खर्च करण्यात येणार आहे. उर्वरीत खर्च सन 2026-27 या आर्थिक वर्षामध्ये "मनपा सार्व. इमारत/ मालमत्ता देखभाल दुरूस्ती/ पाण्याच्या टाक्या व इतर कामे" या लेखशिर्षामध्ये तरतुद करून खर्च करण्यात येणार आहे. सदरचे काम हे पॅनलव्दारे करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषतः कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद अ. शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध मालमत्ता अंतर्गत स्मशानभुमी, दफनभुमी, मनपा मुख्य कार्यालय इमारत, मनपा प्रभाग कार्यालये, शाळा इमारती, बालवाडी, अंगणवाडी, अग्निशमन केंद्र, स्काय वॉक, पुतळे, सभागृह, समाजमंदिरे, विरंगुळा केंद्र, स्टेज, वाचनालय, अभ्यासिका व इतर सार्वजनिक इमारती, बस डेपो, बस स्टॅण्ड, आयुक्त निवास / महापौर निवास, विविध नामफलक, दिशादर्शक फलक, आरोग्य केंद्र, रुग्णालय इ., तळी, विहीर, दुभाजक, वाहतुक बेट, सार्वजनिक इमारती गळती प्रतिबंधक इ.कामे द्वि वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्तीची कामे पॅनलद्वारे

करण्यास व सदर कामी रु.10,00,00,000/- इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच ई-निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अ. शर्मा, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत :- बांधकाम/ विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-05/DK/25-26/MT-10

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

**प्रशासकीय सभा दि. १५ /०९/२०२५**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. :-२३० मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात खेळणी,बेचेंस, व्यायामाचे साहीत्य व प्राणी / कार्टुन शिल्प पुरवठा करून बसविणे व जुनी खेळणी दुरूस्ती करणे कामास मुदतवाढ मिळणेबाबत.(E-१४४११६९)**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात खेळणी,बेचेंस, व्यायामाचे साहीत्य व प्राणी / कार्टुन शिल्प पुरवठा करून बसविणे व जुनी खेळणी दुरूस्ती करणेकामी निविदेत सहभाग घेण्यात आलेल्या ठेकेदाराची पॅनलवर (Rate Contract) नियुक्ती (०१ वर्ष कालावधी ) कारणेकामी प्रशासकीय ठराव क्र. ३७७ दि.१३/०२/२०२४ रोजीच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेनुसार जाहीर निविदा online E-tendering N.I.C.(National informatics Centre, Pune) च्या https://mahatenders.gov.in प्रणालीव्दारे व वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देवून निविदा मागवण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार निविदेमध्ये प्राप्त झालेल्या व पात्र ०४ निविदाधारक ०१) मे.सासंगो इंण्डस्ट्रीस ०२) मे. बाबा प्ले वर्ल्ड ०३) मे.हनी फन एन थ्रील कंपनी ०४) मे.श्री. साई इंण्डस्ट्रीस यांची पॅनलवर (Rate Contract) नियुक्ती कारणेकामी प्रशासकीय ठराव क्र. ४८१ दि.१५/०३/२०२४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांच्यासमवेत करारनामा करून दि.१५/०३/२०२४ रोजी कार्यादेश देण्यात आला होता सदर कार्यादेशाची मुदत दि.१५/०३/२०२५ पर्यंत होती. परंतु सदरची मुदत संपलेली आहे. त्यामुळे सदरकामी नव्याने निविदा मागवणे प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्याकरिता ०२ महिन्यांचा कालावधी लागणार आहे तोपर्यंत उद्याने, मैदाने येथे खेळणी,बेचेंस, व्यायामाचे साहीत्य व प्राणी / कार्टुन शिल्प पुरवठा करून बसविणे व जुनी खेळणी दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने मागिल मंजूर पॅनलवर (Rate Contract) नियुक्त केलेले ठेकेदार ०१) मे.सासंगो इंण्डस्ट्रीस ०२) मे. बाबा प्ले वर्ल्ड ०३) मे.हनी फन एन थ्रील कंपनी ०४) मे.श्री. साई इंण्डस्ट्रीस यांना ०३ महिने (१० डिसेंबर २०२५ पर्यंत) मुदतवाढ देणे आवश्यक असून त्याकरिता मा.आयुक्त सो यांनी दि.०३/०९/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब, मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात खेळणी,बेचेंस, व्यायामाचे साहीत्य व प्राणी / कार्टुन शिल्प पुरवठा करून बसविणे व जुनी खेळणी दुरूस्ती करणेकामी मागिल मंजूर पॅनलवर (Rate Contract) नियुक्त केलेले ठेकेदार ०१) मे.सासंगो इंण्डस्ट्रीस ०२) मे. बाबा प्ले वर्ल्ड ०३) मे.हनी फन एन थ्रील कंपनी ०४) मे.श्री. साई इंण्डस्ट्रीस यांना नव्याने मागविण्यात आलेल्या निविदा मंजूर होईपर्यंत ०३ महिने (१० डिसेंबर २०२५ पर्यंत) मुदतवाढ देण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी मा.प्रशासक यांची मान्यता मिळणेस शिफारस असे.

**(कल्पिता पिंपळे)**
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

**प्रशासकीय सभा दि.१५ /०९/२०२५**

**प्रकरण क्र. २३० मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात खेळणी,बेचेंस, व्यायामाचे साहीत्य व प्राणी / कार्टुन शिल्प पुरवठा करून बसविणे व जुनी खेळणी दुरूस्ती करणे कामास मुदतवाढ मिळणेबाबत.(E-१४४११६९)**

**ठराव क्र. २३०**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात खेळणी,बेचेंस, व्यायामाचे साहीत्य व प्राणी / कार्टुन शिल्प पुरवठा करून बसविणे व जुनी खेळणी दुरूस्ती करणेकामी निविदेत सहभाग घेण्यात आलेल्या ठेकेदाराची पॅनलवर (Rate Contract) नियुक्ती (०१ वर्ष कालावधी ) कारणेकामी प्रशासकीय ठराव क्र. ३७७ दि.१३/०२/२०२४ रोजीच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेनुसार जाहीर निविदा online E-tendering N.I.C.(National informatics Centre, Pune) च्या https://mahatenders.gov.in प्रणालीव्दारे व वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देवून निविदा मागवण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार निविदेमध्ये प्राप्त झालेल्या व पात्र ०४ निविदाधारक ०१) मे.सासंगो इंण्डस्ट्रीस ०२) मे. बाबा प्ले वर्ल्ड ०३) मे.हनी फन एन थ्रील कंपनी ०४) मे.श्री. साई इंण्डस्ट्रीस यांची पॅनलवर (Rate Contract) नियुक्ती कारणेकामी प्रशासकीय ठराव क्र.४८१ दि.१५/०३/२०२४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांच्यासमवेत करारनामा करून दि.१५/०३/२०२४ रोजी कार्यादेश देण्यात आला होता सदर कार्यादेशाची मुदत दि.१५/०३/२०२५ पर्यंत होती. परंतु सदरची मुदत संपलेली आहे. त्यामुळे सदरकामी नव्याने निविदा मागवणे प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्याकरिता ०२ महिन्यांचा कालावधी लागणार आहे तोपर्यंत उद्याने, मैदाने येथे खेळणी,बेचेंस, व्यायामाचे साहीत्य व प्राणी / कार्टुन शिल्प पुरवठा करून बसविणे व जुनी खेळणी दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने मागिल मंजूर पॅनलवर (Rate Contract) नियुक्त केलेले ठेकेदार ०१) मे.सासंगो इंण्डस्ट्रीस ०२) मे. बाबा प्ले वर्ल्ड ०३) मे.हनी फन एन थ्रील कंपनी ०४) मे.श्री. साई इंण्डस्ट्रीस यांना ०३ महिने (१० डिसेंबर २०२५ पर्यंत) मुदतवाढ देणे आवश्यक असून त्याकरिता आयुक्त यांनी दि.०३/०९/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद अरीबम शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात खेळणी, बेचेंस, व्यायामाचे साहीत्य व प्राणी / कार्टुन शिल्प पुरवठा करून बसविणे व जुनी खेळणी दुरूस्ती करणेकामी मागिल मंजूर पॅनलवर (Rate Contract) नियुक्त केलेले ठेकेदार ०१) मे.सासंगो इंण्डस्ट्रीस ०२) मे. बाबा प्ले वर्ल्ड ०३) मे.हनी फन एन थ्रील कंपनी ०४) मे.श्री. साई इंण्डस्ट्रीस यांना नव्याने मागविण्यात आलेल्या निविदा मंजूर होईपर्यंत ०३ महिने (१० डिसेंबर २०२५ पर्यंत) मुदतवाढ देण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता ठरावाद्वारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(राधाबिनोद अरीबम शर्मा, भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)**

**ता.जि.ठाणे 401101**

**समाजविकास विभाग**

**मा. प्रशासकीय सभा दि.१५/ ९ /2025**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रं. (२३१)** :- महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम 2016 नुसार पाच वर्षाकरीता नगर पथ विक्रेता समिति स्थापन करुन मा.नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई येथे अधिसुचित करण्यासाठी पाठविणेबाबत. (E-२१४१६०३)

केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान फेरीवाल्यांना सहाय्य या उपांगाअंतर्गत शहरातील फेरीवाल्यांना बाजाराच्या गरजेच्या आधारावर कौशल्यांचा विकास करून त्यांच्या उपजिविकेचा दर्जा उंचावण्यावर भर दिला जाणार आहे. त्या अनुषंगाने शहरी फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, त्यांना ओळखपत्र देणे, शहरी फेरीवाला आराखाडा विकसित करणे, फेरीवाला क्षेत्रासाठी आवश्यक पायाभुत सुविधांचा विकास करणे, त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक विकास करणे हे या उपांगाचे उद्दीष्ट आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण 8528 पथविक्रेत्यांचे बायोमेट्रिक पध्दतीने सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.

वरील उपाय योजना पूर्ण करण्यासाठी तसेच राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी नगर पथ विक्रेता समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने श्री.तुषार सोनावणे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सहाय्याने दि.30/05/2025 रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2016 नुसार पथविक्रेत्यामधून निवडणूक प्रक्रियेव्दारे 7 प्रतिनिधींची निवड करण्यात आलेली आहे

| अ.क्र. | निवडून आलेले सदस्य | प्रवर्ग |
|---|---|---|
| 1 | श्री. गणेश भिवा बागडे | अनुसुचित जाती (SC) |
| 2 | रिक्त | अनुसुचित जमाती (ST) |
| 3 | श्री.लक्ष्मण दामोदर मुंजेवार | इतर मागास वर्ग (OBC) |
| 4 | श्रीम. आयडा लिओ मांडवीघर | अल्पसंख्यांक (MINORITY) |
| 5 | श्री.बिरेंद्र रामआवतार गुप्ता | सर्व साधारण (पुरुष वर्ग) (OPEN) |
| 6 | श्री.महेश सुभाषचंद्र जैसवाल | सर्व साधारण (पुरुष वर्ग ) (OPEN) |
| 7 | श्रीम. छाया विलास खाडे | सर्व साधारण (महिला वर्ग) (OPEN) |
| 8 | श्री. रमेश जोतीराम म्हस्के | विकलांग व्यक्ती (HANDICAP) |

उर्वरित 6 नामनिर्देशित सदस्यांची निवड करणेबाबत मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि.25/08/2025 रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकित खालील उमेदवारांची सोडत चिठ्ठीव्दारे नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | उमेदवारांचे नाव |
|---|---|---|
| 1 | अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना | 1.श्री.रुपेश रंगराव पाटील<br>2.श्री.प्रकाश निवृत्ती बाणमारे |
| 2 | निवासी कल्याण संघ | 1.श्री.मुकेश विश्वनाथ सिंह<br>2.श्री.सचिन भास्कर सावरकर |
| 3 | व्यापारी संघ | 1.श्री.ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल (गडोदिया) |
| 4 | पणन संघ | रिक्त |

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2016 नुसार खालीलप्रमाणे नगरपथविक्रेता समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शासकीय विभाग | | पद |
|---|---|---|---|
| 1 | मा.आयुक्त तथा प्रशासक मिरा भाईंदर महानगरपालिका | | अध्यक्ष |
| 2 | पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक | | सदस्य |
| 3 | विशेष नियोजन प्राधिकरणाचे कार्यकारी प्रमुख किंवा प्रतिनिधी | | सदस्य |
| 4 | पोलिस सह-आयुक्त किंवा पोलिस उप अधिक्षक/सहायक पोलीस अधीक्षक (वाहतूक-प्रभारी अधिकारी) | | सदस्य |
| 5 | कार्यकारी आरोग्य अधिकारी किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी | | सदस्य |
| | इतर मंडळे (पथविक्रेतेमधून निवडून आलेले सदस्य) | | |
| 6 | श्री. गणेश भिंवा बागडे | (अनुसुचित जाती) | सदस्य |
| 7 | रिक्त | (अनुसुचित जमाती) | रिक्त |
| 8 | श्री.लक्ष्मण दामोदर मुंजेवार | (इतर मागास वर्ग) | सदस्य |
| 9 | श्रीम. आयडा लिओ मांडवीघर | (अल्पसंख्यांक) | सदस्य |
| 10 | श्री.बिरेंद्र रामआवतार गुप्ता | सर्व साधारण (पुरुष वर्ग) | सदस्य |
| 11 | श्री.महेश सुभाषचंद्र जैसवाल | सर्व साधारण (पुरुष वर्ग ) | सदस्य |
| 12 | श्रीम. छाया विलास खाडे | सर्व साधारण (महिला वर्ग) | सदस्य |
| 13 | श्री. रमेश जोतीराम म्हस्के | (विकलांग व्यक्ती) | सदस्य |
| | नामनिर्देशित सदस्य | | |
| 14 | 1.श्री.रुपेश रंगराव पाटील | (अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना) | सदस्य |
| 15 | 2.श्री.प्रकाश निवृत्ती बाणमारे | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | 1.श्री.मुकेश विश्वनाथ सिंह | (निवासी कल्याण संघ) | सदस्य |
| 17 | 2.श्री.सचिन भास्कर सावरकर | | |
| 18 | 1.श्री.ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल (गडोदिया) | (व्यापारी संघ) | सदस्य |
| 19 | रिक्त | पणन संघ | — |
| 20 | व्यवस्थापक बँक ऑफ महाराष्ट्र | अग्रणी बँकेचा प्रतिनिधी | सदस्य |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी वरीलप्रमाणे नमुद केलेली नगरपथविक्रेता समिती पाच वर्षाकरिता गठीत करणेकामी मा.प्रशासकिय ठराव करण्यास तसेच सदर नगरपथविक्रेता समिती मा.नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई येथे पाठविणेकामी शिफारस करीत आहे.

**(कल्पिता पिंपळे)**
**उप-आयुक्त तथा**
**शहर प्रकल्प अधिकरी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)**
**ता.जि.ठाणे 401101**
**समाजविकास विभाग**
**मा. प्रशासकीय सभा दि.१५/ ९ /2025**

**// प्रशासकीय ठराव //**

**प्रकरण क्रं.** २३९ **:-** महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम 2016 नुसार पाच वर्षाकरीता नगर पथ विक्रेता समिती स्थापन करुन मा.नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई येथे अधिसुचित करण्यासाठी पाठविणेबाबत..

**प्रशासकीय ठराव क्र.** २३९

केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान फेरीवाल्यांना सहाय्य या उपांगाअंतर्गत शहरातील फेरीवाल्यांना बाजाराच्या गरजेच्या आधारावर कौशल्यांचा विकास करून त्यांच्या उपजिविकेचा दर्जा उंचावण्यावर भर दिला जाणार आहे. त्या अनुषंगाने शहरी फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, त्यांना ओळखपत्र देणे, शहरी फेरीवाला आराखाडा विकसित करणे, फेरीवाला क्षेत्रासाठी आवश्यक पायाभुत सुविधांचा विकास करणे, त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक विकास करणे हे या उपांगाचे उद्दीष्ट आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण 8528 पथविक्रेत्यांचे बायोमेट्रिक पध्दतीने सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.

वरील उपाय योजना पूर्ण करण्यासाठी तसेच राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी नगर पथ विक्रेता समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने श्री.तुषार सोनावणे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सहाय्याने दि.30/05/2025 रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2016 नुसार पथविक्रेत्यामधून निवडणूक प्रक्रियेव्दारे 7 प्रतिनिधींची निवड करण्यात आलेली आहे

| अ.क्र. | निवडून आलेले सदस्य | प्रवर्ग |
|---|---|---|
| 1 | श्री. गणेश भिवा बागडे | अनुसुचित जाती (SC) |
| 2 | रिक्त | अनुसुचित जमाती (ST) |
| 3 | श्री.लक्ष्मण दामोदर मुंजेवार | इतर मागास वर्ग (OBC) |
| 4 | श्रीम. आयडा लिओ मांडवीघर | अल्पसंख्यांक (MINORITY) |
| 5 | श्री.बिरेंद्र रामआवतार गुप्ता | सर्व साधारण (पुरुष वर्ग) (OPEN) |
| 6 | श्री.महेश सुभाषचंद्र जैसवाल | सर्व साधारण (पुरुष वर्ग ) (OPEN) |

| | | |
|---|---|---|
| 7 | श्रीम. छाया विलास खाडे | सर्व साधारण (महिला वर्ग) (OPEN) |
| 8 | श्री. रमेश जोतीराम म्हस्के | विकलांग व्यक्ती (HANDICAP) |

उर्वरित 6 नामनिर्देशित सदस्यांची निवड करणेबाबत मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि.25/08/2025 रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकित खालील उमेदवारांची सोडत चिठ्ठीव्दारे नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | उमेदवारांचे नाव |
|---|---|---|
| 1 | अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना | 1.श्री.रुपेश रंगराव पाटील<br>2.श्री.प्रकाश निवृत्ती बाणमारे |
| 2 | निवासी कल्याण संघ | 1.श्री.मुकेश विश्वनाथ सिंह<br>2.श्री.सचिन भास्कर सावरकर |
| 3 | व्यापारी संघ | 1.श्री.ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल (गडोदिया) |
| 4 | पणन संघ | रिक्त |

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2016 नुसार खालीलप्रमाणे नगरपथविक्रेता समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शासकीय विभाग | | पद |
|---|---|---|---|
| 1 | मा.आयुक्त तथा प्रशासक मिरा भाईंदर महानगरपालिका | | अध्यक्ष |
| 2 | पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक | | सदस्य |
| 3 | विशेष नियोजन प्राधिकरणाचे कार्यकारी प्रमुख किंवा प्रतिनिधी | | सदस्य |
| 4 | पोलिस सह-आयुक्त किंवा पोलिस उप अधिक्षक/सहायक पोलीस अधीक्षक (वाहतूक-प्रभारी अधिकारी) | | सदस्य |
| 5 | कार्यकारी आरोग्य अधिकारी किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी | | सदस्य |
| इतर मंडळे (पथविक्रेतेमधून निवडून आलेले सदस्य) | | | |
| 6 | श्री. गणेश भिवा बागडे | (अनुसुचित जाती) | सदस्य |
| 7 | रिक्त. | (अनुसुचित जमाती) | रिक्त |
| 8 | श्री.लक्ष्मण दामोदर मुंजेवार | (इतर मागास वर्ग) | सदस्य |
| 9 | श्रीम. आयडा लिओ मांडवीघर | (अल्पसंख्यांक) | सदस्य |
| 10 | श्री.बिरेंद्र रामआवतार गुप्ता | सर्व साधारण (पुरुष वर्ग) | सदस्य |
| 11 | श्री.महेश सुभाषचंद्र जैसवाल | सर्व साधारण (पुरुष वर्ग ) | सदस्य |
| 12 | श्रीम. छाया विलास खाडे | सर्व साधारण (महिला | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | वर्ग) | | |
| 13 | श्री. रमेश जोतीराम म्हस्के (विकलांग व्यक्ती) | | सदस्य |
| | नामनिर्देशित सदस्य | | |
| 14 | 1.श्री.रुपेश रंगराव पाटील | (अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना) | सदस्य |
| 15 | 2.श्री.प्रकाश निवृत्ती बाणमारे | | |
| 16 | 1.श्री.मुकेश विश्वनाथ सिंह | (निवासी कल्याण संघ) | सदस्य |
| 17 | 2.श्री.सचिन भास्कर सावरकर | | |
| 18 | 1.श्री.ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल (गडोदिया) | (व्यापारी संघ) | सदस्य |
| 19 | रिक्त | पणन संघ | रिक्त |
| 20 | व्यवस्थापक बँक ऑफ महाराष्ट्र | अग्रणी बँकेचा प्रतिनिधी | सदस्य |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी वरीलप्रमाणे नमुद केलेली नगरपथविक्रेता समिती पाच वर्षाकरिता गठीत करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदर नगरपथविक्रेता समिती अधिसुचित करण्यासाठी मा.नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पाठविणेकामी पारित ठरावानुसार समाजविकास विभागाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

राधाबिनोद अरिबम शर्मा (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\USERS\HP\DOWNLOADS\ठरावकिय ठराव नगरपथविक्रेता समिती.DOC

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम /विदयूत विभाग

दि. १५/०९ /२०२५

**॥ गोषवारा ॥**

प्रकरण क्र. (२३२) :- **सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकामासाठी परवानगी, नियोजन व अंमलबजावणीसाठी मानक कार्यपध्दती निश्चित करणे.** (E-2156524)

## १. प्रस्तावना आणि उद्दिष्ट

शहरातील आरोग्य, पर्यावरणीय शाश्वतता आणि नागरी प्रतिष्ठा यासाठी स्वच्छता पायाभूत सुविधा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. मिरा-भाईंदरसारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरांमध्ये लोकसंख्येचा घनता, वाढते झोपडपट्टी विस्तार आणि सार्वजनिक जागांचा अधिकाधिक वापर या गोष्टींमुळे स्वच्छ, सुलभ व देखभालयुक्त सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांची गरज अधिक तीव्र झाली आहे.

**मिरा-भाईंदर महानगरपालिका** (MBMC) ही आपले व्यापक स्वच्छता ध्येय लक्षात घेऊन व **स्वच्छ भारत मिशन- शहरी २.०** यांसारख्या राष्ट्रीय उपक्रमांशी सुसंगत राहून, नव्या सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या नियोजन, परवानगी आणि बांधकामासाठी एक सुस्पष्ट, पारदर्शक व सर्वसमावेशक प्रक्रिया विकसित करत आहे.
ही SOP खालील बाबींसाठी प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करते:

- नव्या शौचालयांसाठी प्रस्ताव प्राप्त करणे व प्रक्रिया करणे.
- गरजांवर आधारित, समावेशक व शाश्वत पायाभूत सुविधा नियोजन करणे.
- पात्रता, प्रक्रिया व तांत्रिक आवश्यकता स्पष्ट करणे.
- मंजुरी व संस्था-स्तरीय समन्वय यंत्रणा स्थापित करणे.
- सार्वजनिक उपयोग व स्थानिक गरजांशी सुसंगत, पर्यावरणपूरक धोरण अंमलात आणणे.
- नव्या शौचालयासाठी जागा निश्चिती करणे.

## २. व्याप्ती (Scope)

ही कार्यपद्धती (SOP) खालील सर्व बाबींवर लागू होते:

- मिरा-भाईंदर महानगरपालिका (MBMC) कडून किंवा खाजगी/सामाजिक भागीदारीतून (PPP/CSR/NGO/SHG) राबवण्यात येणाऱ्या **नवीन सार्वजनिक व सामुदायिक शौचालय प्रकल्पांवर**.
- **सोसायट्या, ट्रस्ट, संस्था, NGO/SHG, कॉर्पोरेट CSR संस्था** यांच्या वतीने प्राप्त होणाऱ्या **परवानगी अर्जांवर**.
- सार्वजनिक वापरासाठी नियोजित असलेल्या खालील जागांवरील शौचालय योजनांसाठी:
    - रस्ते, उद्याने, समुद्रकिनारे, झोपडपट्ट्या, बाजार, रहदारी ठिकाणे अशा **सार्वजनिक जागा**

- ○ बसथांबे, रेल्वे स्थानक, वाहतूक केंद्रे यासारखे **परिवहन ठिकाण**
- ○ **मोठ्या निवासी संकुलांमध्ये किंवा व्यावसायिक परिसरांमध्ये**, जिथे सार्वजनिक वापर अपेक्षित आहे.

## ३. कायदेशीर व धोरणात्मक संदर्भ (Legal & Policy Framework)

ही SOP खालील राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे व धोरणांशी सुसंगत असून त्यावर आधारित आहे:

- **स्वच्छ भारत मिशन – शहरी २.० (SBM-U २.०)**, नगरविकास मंत्रालय, भारत सरकार
- **CPHEEO मार्गदर्शक सल्ला – सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांसाठी (२०१८)**
- **फिकल स्लज व सेप्टेज व्यवस्थापन (FSSM) राष्ट्रीय धोरण**
- **सर्वसमावेशक प्रवेशासाठी समन्वित मार्गदर्शक तत्त्वे (MoHUA – २०२१)**
- **इतर महापालिका/ULB धोरणांचे संदर्भ** – पुणे, मुंबई, इंदूर, सूरत, दिल्ली इत्यादी

## ४. गरज ओळख आणि स्थान निवड निकष

नवीन सार्वजनिक व सामुदायिक शौचालये नेमकी त्या ठिकाणी उभारली जावीत जिथे त्यांची खरी गरज आहे, यासाठी स्थाननिवड ही नीट नियोजित व वस्तुनिष्ठ पद्धतीने केली पाहिजे. ही निवड शहरातील वापराच्या आकडेवारीवर, लोकसंख्येच्या घनतेवर, तक्रारींवर व धोरणात्मक गरजांवर आधारित असेल.

### ४.१. गरज-आधारित स्थान निश्चितीचे निकष

खालील स्थितींमध्ये शौचालयांची गरज म्हणून विचार केला जाईल:

| निकष | **स्पष्टीकरण** |
|---|---|
| **जास्त गर्दीची सार्वजनिक ठिकाणे** | बाजारपेठा, रस्ते, उद्याने, समुद्रकिनारे, बसथांबे, रेल्वे स्थानके, पर्यटन स्थळे |
| **परिवहन व वाहतूक केंद्रे** | बस डेपो, ऑटो/टॅक्सी स्टँड, महत्त्वाचे चौक |
| **अस्वच्छता ग्रस्त झोपडपट्ट्या** | जिथे सध्या शौचालये उपलब्ध नाहीत किंवा संख्या अत्यल्प आहे |
| **मोठ्या सोसायट्या / व्यावसायिक संकुले** | जिथे नागरिक व ग्राहकांसाठी सार्वजनिक प्रवेश असतो |
| **जनतेच्या तक्रारी किंवा मागण्या** | नागरिकांच्या तक्रारी, सामाजिक लेखापरीक्षण, प्रभाग स्तरावरच्या मागण्या |
| **GIS Map City Mapping** | GIS नकाशांवर आधारित आवश्यकतेचे विश्लेषण, विद्यमान शौचालय कव्हरेजचा अभाव |

या निकषांवर आधारित जागा निश्चिती ही शहर अभियंता यांच्या नियंत्रणाखाली टिमद्वारे करण्यात येईल.

### ४.२. स्थान निवड प्रक्रिया

१. **सुरुवात (Initiation):** प्रस्ताव मिभामनपा च्या कोणत्याही विभागाकडून, NGO/SHG/CSR संस्था, सोसायटी किंवा सामान्य नागरिकांकडून करता येईल.

२. **प्राथमिक सर्वेक्षण (Site Survey):** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या टिमद्वारे संबंधित जागा तपासणी करण्यात येतील. तसेच छायाचित्रे व मानांकने तपासण्यात येतील.

३. **जागा पुनरावलोकन:** गर्दी, भूखंडाची उपलब्धता, निचऱ्याची सुविधा, वीज व पाण्याचे स्त्रोत इत्यादींचे मूल्यांकन संबंधित विभागाद्वारे करण्यात येईल.

४. **शहरस्तरीय समितीकडे शिफारस:** पात्र स्थळांची शिफारस तपासणी अहवाल, फोटो व स्थान नकाशासह **शहरस्तरीय तांत्रिक समितीकडे** केली जाईल.

## ४.३. अंतिम मंजुरीसाठी शहरस्तरीय समिती

नवीन शौचालयासाठी अंतिम जागा निवड खालील समितीकडून होईल:

| **सदस्य** | **पद** |
|---|---|
| **अतिरिक्त आयुक्त (घ.व्य.वि)** | अध्यक्ष |
| **नगररचना अधिकारी (Town Planning Officer)** | सदस्य |
| **कार्यकारी अभियंता** | सचिव |
| **NGO/SHG/CSR प्रतिनिधी (असल्यास)** | निरीक्षक (voting नसलेले) |

**टीप** : अंतिम मंजुरी ही गरज, तांत्रिक व्यवहार्यता व धोरणाशी सुसंगततेच्या आधारे दिली जाईल. समितीकडे पर्यायी स्थळ सुचवण्याचा किंवा प्रस्ताव फेटाळण्याचा अधिकार असेल. समितीद्वारे अंतिम अहवाल मंजूरीसाठी मा. आयुक्त यांचेकडे पाठविण्यात येईल.

# ५. भूखंड आवश्यकता, डिझाईन मानके व अंतर्गत सुविधा

नवीन शौचालय बांधकामासाठी जागेची उपलब्धता, डिझाईन मानके आणि मूलभूत सुविधा यांचे एकसंध नियोजन आवश्यक आहे. ही मानके CPHEEO, MoHUA आणि MBMC च्या तांत्रिक मार्गदर्शक तत्त्वांनुसार निश्चित करण्यात आली आहेत.

## ५.१. भूखंड आवश्यकता (Land Requirement)

| **शौचालयाचा प्रकार** | **किमान जागा** | **आदर्श जागा** |
|---|---|---|
| **सार्वजनिक शौचालय (PT)** | १००–१२० चौ.फुट | १५०–२०० चौ.फुट |
| **सामुदायिक शौचालय (CT)** | ३००–५०० चौ.फुट | ६००–८०० चौ.फुट (८–१२ आसनांसाठी) |
| **स्नानगृहासह शौचालय** | प्रत्येकी ४०–६० चौ.फुट अधिक | गरजेनुसार |
| **दिव्यांगांसाठी स्वतंत्र युनिट** | २५–३० चौ.फुट | CPWD मानकांनुसार |

- शौचालयाच्या क्षेत्रात आवश्यकतांनुसार ,त्यात बदल केले जाऊ शकतात.

- प्रस्तावित जागेचे **पार्श्वभूमी, निचरा, वारा, वायुवीजन आणि सुरक्षितता** या बाबतीत मूल्यमापन तांत्रिक समितीद्वारे करण्यात येईल. मा. आयुक्त यांचेमार्फत अशी समिती गठीत करण्यात येईल.

## ५.२ – डिझाईन व बांधकाम मानके (Design & Construction Standards)

*खालील तांत्रिक बाबींचा समावेश अनिवार्य आहे:*

| घटक | आवश्यक मापदंड |
|---|---|
| प्रवेश मार्गाची रुंदी (Passage Width) | किमान **१.५ मीटर** |
| जिन्याची रुंदी (Stair Width) | किमान **१.२ मीटर** |
| शौचालय कॅबिनचा आकार (Toilet Cabin Size) | - W.C.: **१.१० चौ.मी**<br>- स्नानगृह: **१.५० चौ.मी**<br>- संयुक्त (WC+Bath): **२.२० चौ.मी** |
| रॅम्पची रुंदी व उतार (Ramp Width & Slope) | रुंदी: **किमान १.२ मीटर**<br>उतार: **कमाल १:१२** |
| पाणीसाठवण क्षमता (Water Storage Capacity) | - भूमिगत टाकी (UGT): **५६० लिटर प्रति आसन**<br>- ओव्हरहेड टाकी (OHT): **२८० लिटर प्रति आसन** |
| प्लिंथची उंची (Plinth Height) | किमान **०.६ मीटर** |
| छताची उंची (Ceiling Height) | **किमान २.७२ मीटर** |
| परापेटची उंची (Parapet Height) | **किमान १.२ मीटर** |
| सेप्टिक टँकची रचना (Septic Tank Design) | **IS २४७० मानकानुसार** |
| वॉटरप्रूफिंग व सिव्हिल बांधकाम हमी | **किमान १० वर्षांची हमी आवश्यक** |

- महापालिकेच्या विशिष्ट आवश्यकता असू शकतात

## ५.३. शौचालयाच्या सभोवताली तसेच भिंतीवर हिरवळ, व्हर्टीकल ग्रिनरी करणे बंधनकारक असेल

## ५.४. अंतर्गत अनिवार्य सुविधा (Internal Mandatory Amenities)

प्रत्येक संकुलात खालील सुविधा असणे आवश्यक:

| सुविधा | अनिवार्य आहे का? |
|---|---|
| दोन्ही विभाग नजरेखाली असलेला केअरटेकर कॅबिन | ☑ |
| पुरुषांसाठी मूत्रालय | ☑ |
| महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन + इन्सिनरेटर | ☑ |
| (असल्यास) स्नानगृह क्यूबिकल | गरजेनुसार |
| ओला/सुक्या कचऱ्यासाठी वर्गवारीसह कचरापेट्या | ☑ |

| | |
|---|---|
| ओव्हरहेड व अंडरग्राउंड पाणी साठवणूक | ☑ |
| दरवाजे – लॉक, हँडल व हुकसह | ☑ |
| QR कोड अभिप्राय फलक, तक्रार क्रमांक, सूचना फलक | ☑ |
| CCTV (फक्त प्रवेशद्वारी) | ☑ |
| SBM व आरोग्यविषयक IEC माहिती फलक | ☑ |

**मिभामनपा कडून डिझाईन टेम्पलेट पुरवले जातील** किंवा नियुक्त आर्किटेक्टमार्फत डिझाईन मंजुरी घेणे आवश्यक असेल.

**५.५ सर्व प्रकारच्या शौचालया ठिकाणी जाहीरात करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत आवश्यकता असल्यास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात येईल.**

**५.६ CSR मार्फत अथवा NGO च्या खर्चाने शौचालय बाधल्यास सदर शौचालयाची दैनदिन देखभाल व दुरुस्तीसाठी वापरकर्त्यांकडून फी ठरविण्याचे अधिकार व वसूल करण्याचे अधिकार संबधित संस्थेस राहतील.**

## ६. मंजुरी प्रक्रिया, परवानगी कालावधी व संस्थात्मक कार्यप्रवाह

नवीन शौचालय प्रस्तावांना वेळेत व पारदर्शक पद्धतीने मंजुरी देण्यासाठी, तसेच कामकाजाची स्पष्टता राखण्यासाठी खालील संस्थात्मक कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

### ६.१. अर्ज सादरीकरणाचे मार्ग (Application Channels)

नवीन शौचालय बांधकामासाठी प्रस्तावसाठी EOI / ई-निविदा / परिपत्रके / जाहीर आवाहन या शासकीय प्रचलित प्रक्रिया राबविण्यात येतील.

- नोंदणीकृत NGO / SHG / ट्रस्ट / संस्थामार्फत
- खाजगी कंपन्या किंवा CSR भागीदारामार्फत
- निवासी कल्याण संस्था (RWA), हाउसिंग सोसायट्या (सार्वजनिक उपयोगासाठी)
- स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत

**प्रमाणित अर्ज नमुना:** MBMC पूर्वनिर्धारित अर्ज प्रपत्र उपलब्ध करून देईल, ज्यामध्ये खालील माहिती आवश्यक असेल:

- अर्जदाराचे तपशील
- प्रस्तावित जागेचा तपशील (मालकी/परवानगी दस्तऐवजासह)
- हेतू व लाभार्थ्यांचा अंदाज
- आराखडा किंवा प्राथमिक संकल्पना (ऐच्छिक)
- खर्चाचा तपशिल

### ६.२. तांत्रिक व साइट व्यवहार्यता तपासणी

**१० कार्यदिवसांच्या आत** खालीलप्रमाणे तपासणी केली जाईल:

| टप्पा | जबाबदारी | परिणाम |
|---|---|---|
| प्रत्यक्ष स्थळ सर्वेक्षण | बांधकाम /विदयूत व मालमत्ता व्यवस्थापन विभाग | तपासणी यादी व छायाचित्र |
| वॉर्ड स्वच्छता नकाशांशी तुलना | | गरज अंतर विश्लेषण नकाशा |
| निचरा / पाणी / वीज व्यवहार्यता | बांधकाम /विदयूत विभाग | प्रायोगिक मंजुरी |

## ६.२.१. स्थळ मूल्यांकन तपासणी यादी (Site Feasibility Assessment Checklist)

**(SI / Sub-SI व प्रभाग अधिकाऱ्यांनी संयुक्तरित्या भरायची आहे)**

| निकष | तपासणीचे स्वरूप | निरीक्षण / टिपणे |
|---|---|---|
| जमीन सार्वजनिक आहे का? | होय / नाही | दस्तऐवज तपासणी |
| भूखंडाचा आकार आवश्यकतेनुसार आहे का? | होय / नाही | चौ.फुट नमूद करा |
| रस्त्यापासून प्रवेश आहे का? | होय / नाही | रुंदी (फुटांत) |
| पाणी स्त्रोत / नळजोडी जवळ आहेत का? | होय / नाही | अंदाजे अंतर (मीटर) |
| विजेची व्यवस्था सहज शक्य आहे का? | होय / नाही | |
| सांडपाणी निचरा / सीवरजोडी उपलब्ध आहे का? | होय / नाही | सेप्टिक टँक शक्य? |
| स्थळात वारा व वायुवीजन नैसर्गिक आहे का? | होय / नाही | |
| परिसरात पूर्वी शौचालय होते का? | होय / नाही | |
| स्थानिक रहिवाशांची मागणी / अभिप्राय | सकारात्मक / नकारात्मक | कोणाकडून मिळाला |
| कोणतीही जमीन वाद / स्थानिक अडचण | आहे / नाही | तपशील लिहा |

**हा तपासणी फॉर्म अंतिम प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक असेल.**

## ६.३. समितीकडून अंतिम निर्णय व मंजुरी

**शहरस्तरीय तांत्रिक समिती** (भाग 4.3 मध्ये वर्णन) अंतिम निर्णय घेईल:

- मंजुरी
- जागा/डिझाइनमध्ये सुधारणा सुचवणे
- कारणासहित नकार

**निर्णय वेळमर्यादा: अर्ज सादर झाल्यानंतर 15 कार्यदिवसांत.**

### ६.३.१ शहरस्तरीय तांत्रिक समितीच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या

नवीन सार्वजनिक शौचालयांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी पारदर्शक, उत्तरदायित्वपूर्ण आणि तांत्रिकदृष्ट्या सुसंगत निर्णय प्रक्रियेची खात्री करण्यासाठी शहरस्तरीय तांत्रिक समिती कार्य करेल. समितीतील प्रत्येक सदस्याच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत:

| पद | समितीतील भूमिका | जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| अतिरिक्त आयुक्त | अध्यक्ष | - एकंदर मूल्यांकन व मान्यता प्रक्रियेचे नेतृत्व करणे<br>- समिती बैठका बोलावणे व अध्यक्षस्थान भूषवणे<br>- तांत्रिक व्यवहार्यता व मानकांचे पालन सुनिश्चित करणे |
| शहर अभियंता | सदस्य | - बैठकीचे वेळापत्रक, अजेंडा आणि दस्तऐवजीकरण समन्वित करणे<br>- बैठकीची अधिकृत नोंद ठेवणे<br>- प्रशासकीय निकषांचे पालन सुनिश्चित करणे |
| कार्यकारी अभियंता (बांधकाम/विद्युत) | सदस्य | - प्रस्तावित स्थळ व रचनात्मक बाबींचे तांत्रिक परीक्षण करणे<br>- बांधकामाच्या व्यवहार्यतेबाबत अभिप्राय देणे |
| कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा/मलनिस्सारण) | सदस्य | - पाणीपुरवठा व स्वच्छता पायाभूत सुविधांची उपलब्धता व पुरेशी व्यवस्था तपासणे<br>- पाणी जोडणी व टिकावूपणावर मार्गदर्शन करणे |

समितीच्या सामूहिक जबाबदाऱ्या

१. सादर केलेले प्रस्ताव मिभामनपाच्या स्वच्छता उद्दिष्टे व शहरी नियोजन निकषांशी सुसंगत आहेत की नाही हे तपासणे.

२. आवश्यक असल्यास संयुक्त स्थळ पाहणी करणे.

३. भूखंडाची उपयुक्तता, प्रवेशसुलभता, तांत्रिक व्यवहार्यता आणि वापरकर्त्यांची सोय यावर आधारित मूल्यांकन करणे.

**4. खालीलपैकी एक निर्णय देणे:**

- मंजुरी,
- स्थळ/रचना यामध्ये सुधारणा सुचवणे,
- कारणासह नकार.

**५. अंतिम निर्णय अर्ज सादर झाल्यापासून 15 कार्यदिवसांच्या आत संबंधित अधिकाऱ्यास त्रास कळवणे.**

## ६.४. परवानगीचा कालावधी (Validity of Permission)

प्रकल्पानुसार मंजूर परवानगी खालीलप्रमाणे वैध राहील:

| **शौचालय प्रकार** | **परवानगी कालावधी** |
|---|---|
| MBMC द्वारा बांधलेले व चालवलेले | तीन वर्ष अधिक प्रत्येकी १ वर्षाच्या दोन मुदतीसाठी काम समाधानकारक असल्यास |
| CSR / NGO / खासगी संस्थेच्या निधीतून स्थायी बांधकाम | ११ वर्षे (नूतनीकरणायोग्य) |
| पोर्टेबल / मॉड्युलर युनिट | ५-१० वर्षे (डिझाइन व स्थितीनुसार) |

मंजुरीनंतर **६० दिवसांत काम सुरू** करणे आणि **६ महिन्यांत पूर्ण करणे** आवश्यक आहे. विलंब असल्यास अधिकृत मुदतवाढ घ्यावी. अन्यथा नियमानुसार कार्यवाही प्रमाणित करण्यात येईल.

## ६.५. काम करणाऱ्या संस्थेची निवड (Execution Agency Selection)

**अ) जर मिभामनपा स्वतः प्रकल्प राबवत असेल तर:**

- बांधकाम हे पुढील माध्यमातून केले जाईल:
    - **सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD)**
    - किंवा **ई-निविदा / EoI प्रक्रियेद्वारे**

**ब) PPP / CSR / NGO भागीदारी असलेल्या प्रकल्पांसाठी:**

- वृत्तपत्रामध्ये परिपत्रक जाहीर करणे.
- EOI प्रसिध्द करुन संस्थेचे प्रस्ताव मागविणे.

EOI / निविदेद्वारे पात्र अंतिम निवड झालेल्या संस्थेसोबत खालील बाबींच्या आधारावर – MoU / करारानामा करण्यात येईल.

- कामाचा क्षेत्र व उद्दिष्ट
- देखभाल जबाबदाऱ्या
- ब्रँडिंग, जाहिरात व नूतनीकरण अटी
- कालबद्धता, निकष व निर्गमन तरतुदी
- खर्चाचा तपशिल / पॅरामिटर्सच्या आधारावर

## ६.६. खर्च व जबाबदारीचे स्वरूप (Cost Responsibility & Implementation Clarity)

**A. CSR / NGO / संस्था यांच्याद्वारे प्रस्तावित शौचालय (पूर्णतः भागीदार निधीतून)**

- **संपूर्ण खर्च व जबाबदारी** भागीदार संस्थेची असेल.
- संस्थेची निवड निविदा / EOI द्वारे करण्यात येईल.
- यात खालील गोष्टींचा समावेश होईल:
    - सर्व आवश्यक मंजुरी घेणे
    - डिझाईन तयार करणे (MBMC मान्यतेसह)

- बांधकाम, वीज, पाणी जोडणी, अंतर्गत सुविधा
- प्रारंभानंतरची देखभाल व सफाई
- MoU मध्ये स्पष्ट जबाबदाऱ्या नमूद असतील

MBMC केवळ **तांत्रिक मार्गदर्शन, जागेची परवानगी व पोस्ट-अधिकार व्यवस्था** पुरवेल.

**B. मिभामनपा द्वारे निविदा / EoI प्रक्रियेद्वारे अंमलबजावणी**

- काम **PWD, मान्यताप्राप्त ठेकेदार** किंवा खुल्या निविदेद्वारे दिले जाईल.
- देखभाल करार वेगळ्या EoI द्वारे केला जाईल (जर लागू असेल).

मंजूर प्रकल्पांची प्रगती **संकलित व ट्रॅक** केली जाईल व दरमहा आयुक्तांकडे सादर केली जाईल.

## ७. निविदा प्रक्रिया, जाहीर सूचना व दस्तऐवजीकरण मानके

नवीन शौचालय प्रकल्पांमध्ये पारदर्शकता, स्पर्धा व सर्वसमावेशकता सुनिश्चित करण्यासाठी, मिभामनपा द्वारे विविध प्रकल्पांमध्ये वापरल्या जाणाऱ्या जाहिरात व निविदा प्रक्रियेचे मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे निश्चित केली जात आहेत.

### ७.१. अंमलबजावणीचे प्रकार (Modes of Engagement)

प्रकल्पाच्या स्वरूपावर आधारित पुढील प्रकार वापरण्यात येतील:

| पद्धत | तपशील |
|---|---|
| **सार्वजनिक निविदा** | महापालिकेच्या निधीतून बांधले जाणारे प्रकल्प; ई-निविदा पोर्टलद्वारे प्रक्रिया |
| **EoI — अभिरुची पत्र** | NGO, SHG, CSR संस्था इत्यादींकडून कल्पना व प्रस्ताव मागवणे |
| **परिपत्रक / आतंरिक सूचना** | प्रभाग किंवा विभागांकडून स्थळ प्रस्ताव मागवण्यासाठी |
| **जाहिरात / सार्वजनिक सूचना** | नागरिक, संस्था, सोसायट्यांकडून प्रस्ताव मागवण्यासाठी — वृत्तपत्र/MBMC वेबसाइटवर प्रसिद्धी |

### ७.२. प्रस्तावांसाठी आवश्यक कागदपत्रे (Proposal Documentation Requirements)

EoI / CSR / NGO / RWA प्रस्तावांमध्ये पुढील बाबी अनिवार्य असतील:

- उद्देश व कार्यक्षमतेसह पत्र / लेटर ऑफ इंटेंट
- संस्थेचे तपशील व नोंदणी प्रमाणपत्र
- प्रस्तावित स्थळाचा प्राथमिक नकाशा / फोटो
- यापूर्वीच्या अशा कार्याचा अनुभव (किमान ३ वर्ष)
- आर्थिक क्षमता किंवा निधी पुरवठा आश्वासन
- सुचवलेली सुविधा, डिझाइन संकल्पना
- बांधकामानंतर देखभाल जबाबदारी
- शौचालयात पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची यादी

## ७.३. मूल्यांकन निकष (Evaluation Criteria)

प्रस्तावांचे मूल्यांकन MBMC तांत्रिक समितीद्वारे खालील निकषांवर आधारित असेल:

| निकष | गुणांकन (%) |
|---|---|
| स्थळाची गरज व लोकसंख्येचा लाभ | २५% |
| तांत्रिक स्पष्टता व डिझाईन सुत्रबद्धता | २०% |
| यापूर्वीचा अनुभव (किमान ३ वर्ष) | २०% |
| समुदाय सहभाग किंवा देखभाल मॉडेल | १५% |
| आर्थिक व्यवहार्यता / निधी स्रोत | २०% |

**किमान पात्रता गुण: ७०%**

## ७.४. MoU / परवाना करार

**पात्र झाल्यानंतर:**

- **LoI (Letter of Intent)** दिला जाईल
- त्यानंतर खालील बाबी स्पष्ट करणारा **MoU किंवा करारपत्र** केला जाईल:
    - कामाची कालमर्यादा
    - बांधकाम मानके व गुणवत्ता निकष
    - देखभाल / स्वच्छता व्यवस्थापन
    - ब्रँडिंग, जाहिरात, व नूतनीकरण अटी
    - निकष उल्लंघन झाल्यास समाप्तीचे अधिकार
    - संस्थेद्वारे देण्यात येणाऱ्या सुविधा

सर्व प्रस्ताव, नकाशे, MoU, छायाचित्रे, मूल्यांकन व अहवाल **डिजिटल नोंद प्रणालीमध्ये सुरक्षित ठेवले जातील.**

**७.५ संपुर्ण शौचालयाचे संचलन हे MOU नुसार करणे बंधनकारक राहील.**

## ८. देखरेख, हस्तांतरण व बंद प्रक्रिया (Monitoring, Handover & Closure Protocols)

नवीन बांधलेले शौचालय योग्य प्रकारे कार्यान्वित व्हावे, गुणवत्तेची खात्री रहावी, आणि उत्तरादायित्व सुनिश्चित व्हावे यासाठी खालील देखरेख व हस्तांतरण प्रक्रिया निश्चित केली जाते.

## ८.१. बांधकाम दरम्यान पर्यवेक्षण (Construction Supervision & Quality Monitoring)

शौचालय बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर खालील निरीक्षण पद्धत अवलंबली जाईल:

| टप्पा | निरीक्षक अधिकारी | जबाबदारी |
|---|---|---|
| पूर्व बांधकाम (ले-आउट, | कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता | साइट निश्चिती, स्थानिक सूचना |

| | | |
|---|---|---|
| मोजणी) | | |
| बांधकाम चालू असताना | उप-अभियंता / कार्यकारी अभियंता | गुणवत्तेची तपासणी, आठवड्याचा प्रगती अहवाल |
| अंतिम टप्पा | शहर अभियंता | तपासणी चेकलिस्ट |

प्रत्येक टप्प्याचा फोटो व स्थिती अहवाल **डिजिटल डॅशबोर्डवर अपलोड** केला जाईल.

## ८.२. पूर्णता व सुरूवात (Completion & Commissioning)

बांधकाम पूर्ण झाल्यानंतर:

- **संयुक्त तपासणी** केली जाईल –
  - शहर अभियंता
  - कार्यकारी अभियंता
  - उप-अभियंता
- सुरूवात फक्त खालील गोष्टी सुनिश्चित झाल्यावर:
  - संरचना व पाईपलाइन तपासणी
  - पाणी व वीज कनेक्शन कार्यरत
  - सर्व सुविधा कार्यरत
  - QR कोड फीडबॅक डिस्प्ले लावलेले
  - सुरक्षितता व प्रवेशमानक पूर्ण
  - पुरविण्यात आलेल्या सुविधा

यानंतर "**Toilet Commissioning Certificate**" दिला जाईल.

## ८.३. हस्तांतरण प्रक्रिया (Handover Protocol)

प्रकल्पाच्या स्वरूपानुसार पुढीलप्रमाणे हस्तांतरण केले जाईल:

| **प्रकार** | **हस्तांतरण प्रक्रिया** |
|---|---|
| मिभामनापाने बांधलेले व चालवलेले | मालमत्ता विभागाच्या मालमत्तेत नोंद |
| मिभामनापानेबांधलेले, NGO/SHG चालवलेले | MoU द्वारे संचालन अधिकार दिले जातील |
| CSR/NGO बांधलेले | अधिकृत हस्तांतरण दस्तऐवज + देखभाल करार |
| सोसायटी/गृहसंस्था | सार्वजनिक वापर अटींसह करार |

**हस्तांतरण कागदपत्रांमध्ये हे असावे:**

- स्थळ सूची, उपकरणांची यादी
- फोटो व तपासणी चेकलिस्ट
- संबंधित अधिकारी यांचे नाव

## ८.४. देखभाल व दीर्घकालीन देखरेख

हस्तांतरानंतर सर्व शौचालय युनिट्सना एमबीएमसीच्या वार्षिक स्वच्छता देखभाल योजनेत (Annual Sanitation Maintenance Plan - ASMP)समाविष्ट करण्यात येईल. शौचालयाच्या प्रकारानुसार देखभाल व देखरेख यामध्ये आवश्यकतेनुसार बदल केले जातील.

**अ. सार्वजनिक शौचालये (Public Toilets - PT)**

दैनंदिन संचालन व देखभाल तृतीय पक्ष कंत्राटदारांमार्फत एमबीएमसीच्या ऑपरेशन व मेंटेनन्स एसओपीनुसार केली जाईल.

१.दैनंदिन तपासणी स्वच्छता अधिकारी किंवा नियुक्त कर्मचाऱ्यांद्वारे केली जाऊ शकते, जे सेवा गुणवत्ता व स्वच्छतेची खात्री करतील.

२.मासिक प्रगती अहवाल (Monthly Progress Report - MPR) कंत्राटदाराकडून सादर केला जाईल व संबंधित वॉर्ड कार्यालयात पडताळणी केली जाईल.

३.ही शौचालये वेळोवेळी स्वच्छ भारत मिशन (SBM) व वॉटर प्लस प्रमाणपत्रासाठी तपासली जातील.

४. शौचालय बंद असणे, गैरवापर किंवा अस्वच्छ स्थिती आढळल्यास, ऑपरेशन व मेंटेनन्स करारानुसार दंड किंवा सुधारात्मक कारवाई केली जाईल.

**समुदाय शौचालये (Community Toilets - CT)**

१.देखभाल स्वयं-सहाय्यता गट (SHG), रहिवासी कल्याण संस्था (RWA) किंवा नियुक्त देखरेखदारांमार्फत केली जाऊ शकते, एमबीएमसीकडून आवश्यक त्या सहकार्यासह.

२.आठवड्यातून एकदा तपासणी कनिष्ठ अभियंता / स्वच्छता अधिकारी यांच्याकडून केली जाईल.

३.एक मूलभूत मासिक देखरेख तपासणी यादी (चेकलिस्ट) एमबीएमसीकडे पुनरावलोकनासाठी सादर केली जाईल.

४.सामुदायिक अभिप्राय यंत्रणा (QR कोड, सूचना नोंदवही) बसविणे आवश्यक आहे.

५.देखभाल योग्य न झाल्यास किंवा तक्रारी प्राप्त झाल्यास, एमबीएमसी व्यवस्थापन बदलू शकते किंवा सुधारणा योजना राबवू शकते.

**संस्था-संलग्न शौचालये (Institutional / Facility-Attached Toilets - IFT)**

१.दैनंदिन देखभालची जबाबदारी संबंधित संस्थेवर (जसे की बाजार समिती, शाळा प्रशासन, वाहतूक प्राधिकरण) असेल.

२.त्रैमासिक तपासणी एमबीएमसीकडून वापर, स्वच्छता व संरचनात्मक स्थिती तपासण्यासाठी केली जाईल.

